लोकमत

# सेंद्रिय शेतीवर कार्यशाळेतून मार्गदर्शन

**वर्धा** : बजाज समूहाच्या सामाजिक दायित्वातर्गत सोमवारी वर्धा येथे 'शेतकरी मेळाव्या'चे आयोजन करण्यात आले. देशी बियाणांच्या वाणांना प्रोत्साहन देणे बियांची निवड आणि उपचार याबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने एक प्रदर्शन-कम-कार्यशाळा आयोजित केली होती. जिल्ह्यात बियाणे पुरेशा प्रमाणात आणण्यासाठी मेळाव्याने शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करण्यास प्रोत्साहित केले. बजाज फाऊंडेशनचे विश्वस्त अपूर्व बजाज यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यशाळेत जिल्हा विकास व्यवस्थापक, नाबार्ड प्रवीण मुळे, प्रकल्प संचालक (आत्मा) विद्या मानकर, हरिभाई मोरी बजाज फाऊंडेशन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

Hello Wardha
Page No. 2 Mar 01, 2022
Powered by: erelego.com